# पुणे मेट्रो आणि पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले मंडई परिसराचा कायापालट

**दिनांक २८/११/२०२२**



महात्मा फुले मंडई येथे मेट्रोच्या भूमिगत स्थानकाचे काम वेगाने सुरु आहे. महात्मा फुले मंडईची ऐतिहासिक वास्तू आणि त्या परिसरात असणारे विविध वस्तूंचे मार्केट, दुकाने यामुळे हा परिसर अतिशय गजबजलेला असतो. तसेच कसबा पेठ, शुक्रवार पेठ आणि बुधवार पेठ या परिसरात मोठ्या प्रमाणावर ऐतिहासिक वास्तू आहेत, जसे कि लाल महाल, शनिवार वाडा, नाना वाडा, विश्रामबाग वाडा, पुण्याचे ग्राम दैवत कसबा गणपती आणि तांबडी जोगेश्वरी, दगडूशेट गणपती, त्रिशुंड गणपती, तुळशीबाग इ. या सर्व ठिकाणांना जोडण्यासाठी आणि एक 'हेरिटेज वॉक' द्वारे या ठिकाणांची माहिती देण्यासाठी पुणे मेट्रो आणि पुणे महानगरपालिका यांनी एक आराखडा बनवला असून त्यासंबंधीच्या करारावर नुकत्याच स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारावर पुणे महानगरपालिकेतर्फे आयुक्त श्री. विक्रम कुमार आणि पुणे मेट्रोतर्फे श्री. अतुल गाडगीळ, संचालक (कार्य) यांनी स्वाक्षरी केली.



**यानिमित्त मंडई परिसरात घेण्यात येणाऱ्या कामांची सूची –**

१. मंडई मेट्रो स्थानक आणि बुधवार पेठ मेट्रो स्थानक यामुळे या परिसरात सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर बदल होणार आहे. त्याअनुषंगाने बस थांबे, ई-रिक्षा, सायकल, दुचाकी, तीन चाकी, चार चाकी पार्किंग यांचा सर्वसमावेशक विचार करून वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उपाययोजना करणे.

२. पादचाऱ्यांसाठी पादचारी मार्ग आणि भूमिगत पादचारी मार्ग यांचे योग्य नियोजन करून या परिसरात हेरिटेज वॉक टूरसाठी आवश्यक त्या बाबींची पूर्तता करणे. या परिसरात असणाऱ्या ऐत्याहासिक वास्तू, तांबट आळी, बुरुड आळी धार्मिक स्थळे, म. फुले मंडई आणि तुळशीबाग या सर्व ठिकाणे सहज पायी चालत जाण्याजोगी आहेत. त्यामुळे 'सेल्फ गाईडेड ऑडिओ टूर' सुरु करण्याचे नियोजन आहे.


३. मेट्रो कामांमुळे विस्थापित झालेल्या दुकानांचे मंडईच्या बाजूला नवीन भवन बांधून पुनर्वसन करणे. हे नवीन भवन जुन्या मंडईच्या भवनाला अनुरूप असे असेल. नवीन भावनांचेबाह्यरूप हे मंडईच्या हेरिटेज वास्तूला साम्य असणारे बनविण्यात येणार आहे.

४. तसेच मंडई परिसरात एक टेरेस ओपन एअर थिएटर बांधण्यात येऊन वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यासाठी लागणाऱ्या सोयीची पूर्तता करण्यात येईल.

५. मंडईच्या मुख्य वास्तूच्या बाजूला पादचाऱ्यांसाठी ‘स्पेशल बॅरिअर फ्री पेडेस्ट्रीयन झोन’ बनविण्यात येईल. या भागात दुचाकी, तीन चाकी, चार चाकी अश्या वाहनांना मज्जाव असेल.



महात्मा फुले मंडई परिसरात विकासासाठी अंदाजे ११.६८ कोटी खर्च येणार असून पुणे मेट्रो आणि पुणे महानगरपालिका हे दोघे मिळून हा खर्च करणार आहेत. या कामामुळे मंडई परिसरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत  होऊन भूमिगत पादचारी मार्गांमुळे पादचाऱ्यांसाठी विना अडथळा या परिसरात फिरणे शक्य होणार आहे. हेरिटेज टूरमुळे पर्यटकांना या परिसराची इत्यंभूत माहिती व अनुभव घेता येईल. ओपन एअर थिएटरमुळे विविध सांस्कृतिक कार्यक्रम करणे शक्य होणार आहे. महात्मा फुले मंडई येथील मेट्रो स्थानकामुळे संपूर्ण पुणे आणि पिंपरी चिंचवड शहर महात्मा फुले मंडई आणि परिसराशी जोडले जाणार आहे. त्यामुळे या परिसरातील व्यापारउदीम वाढण्यास मदत होईल.



याप्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी म्हंटले आहे की, “महामेट्रो केवळ मेट्रो स्थानकांच्या विकासाव्यतिरिक्त मेट्रो स्थानकांभोवतीच्या परिसराचादेखील विकास करण्यासाठी प्रयत्नशील आहे. पुणे महानगरपालिका यांच्या सहकारीमुळे महात्मा फुले मंडई परिसराचा विकासाचा आराखडा करण्यात आला आहे. प्रस्तावित आराखड्यामुळे या परिसराचे रूप पालटणार आहे. संपूर्ण महात्मा फुले मंडई पादचारी स्नेही करण्यात येणार आहे.”